**ठळक बातम्या**

- होमगार्ड, कोतवाल, ग्राम रोजगार सेवकांना मानधन वाढ, विशेष शिक्षकांच्या पावणे ५ हजारांहून अधिक पदांची निर्मिती करण्याचा राज्य मंत्रिमंडळाचा निर्णय

- सोनार आणि आर्य वैश्य समाजासाठी आर्थिक विकास महामंडळ स्थापन करायला राज्य सरकारची मान्यता, देशी गायींना ‘राज्यमाता-गोमाता’ जाहीर करण्याचा शासन निर्णय जारी

- संघटित पद्धतीने केलेल्या सायबर गुन्ह्यासंदर्भात पुण्यातल्या १० जणांसह देशभरातल्या २६ आरोपींना सीबीआयकडून अटक

**आणि**

- ज्येष्ठ अभिनेते मिथुन चक्रवर्ती यांना दादासाहेब फाळके जीवनगौरव पुरस्कार जाहीर

**<><><><><>**

राज्यातले होमगार्ड, कोतवाल, ग्राम रोजगार सेवकांना मानधन वाढ, विशेष शिक्षकांच्या पावणे ५ हजारांहून अधिक पदांची निर्मिती आणि निवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांना देण्यात येणाऱ्या रकमेत वाढ करण्याचे निर्णय राज्य सरकारनं आज घेतले. कोतवालांना मानधनात १० टक्के वाढ आणि अनुकंपा धोरण राज्य सरकार लागू करणार आहे. ग्राम रोजगार सेवकांना आता ७ हजार रुपये मानधन आणि प्रोत्साहन अनुदान दिलं जाणार आहे. याशिवाय विशेष शिक्षकांच्या ४ हजार ८६० पदांची निर्मिती करायला मंत्रीमंडळानं आज मंजुरी दिली. राज्य सरकारच्या सेवेतल्या कर्मचाऱ्यांसाठीचं सेवानिवृत्ती उपदान, मृत्यू उपदानाची मर्यादा वाढवून २० लाख होणार आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे मंत्रीमंडळ बैठकीच्या अध्यक्षस्थानी होते. मराठा आरक्षणासंदर्भात नेमलेल्या माजी न्यायमूर्ती संदीप शिंदे समितीचा दुसरा आणि

तिसरा अहवाल राज्य सरकारनं आज स्वीकारला. सोनार समाजासाठी संत नरहरी महाराज आर्थिक विकास महामंडळ आणि आर्य वैश्य समाजासाठी श्री वासवी कन्यका आर्थिक विकास महामंडळ स्थापन करायला मंत्रीमंडळानं मंजुरी दिली आहे.

**बार्टीच्या धरतीवर वनार्टी** स्वायत्त संस्था होणार आहे. धारावीतल्या अपात्र झोपडीधारकांसाठी परवडणारी भाडेतत्त्वावरची घरं उभारण्याची जबाबदारी धारावी पुनर्वसन प्रकल्पाला देण्यात आली आहे. रमाबाई आंबेडकर नगर, कामराज नगरच्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेला सरकार गती देणार आहे. याशिवाय केंद्र सरकारच्या मिठागराच्या जमिनी राज्य शासनाला मिळणार असून यामुळं दुर्बलांसाठी घरांच्या योजनांना वेग येणार आहे. ठाणे वर्तुळाकार मेट्रो रेल्वे प्रकल्पाच्या १२ हजार २०० कोटींच्या सुधारित आराखड्याला राज्य सरकारनं मान्यता दिली. मुंबईत ऑरेंज गेट ते मरीन ड्राईव्ह भुयारी मार्ग आणि ठाणे ते बोरिवली भुयारी मार्गासाठी निधी उभारण्याचा पर्यायांनाही मंत्रीमंडळानं मंजुरी दिली.

**पालघर** जिल्ह्यातल्या मुरबे इथे बहुउद्देशीय बंदर प्रकल्प उभारायला राज्य सरकारची मान्यता मिळाली. राष्ट्रीय दर्जाचं क्रीडा संकुल उभारण्यासाठी आकुर्डी, मालाड आणि वाढवणमधली जागा भारतीय क्रीडा प्राधिकरणाला दिली जाणार आहे. देशी गाईंच्या पालन पोषणासाठी अनुदान योजना, राज्य जलसंपत्ती माहिती केंद्राची स्थापना, अनुसूचित जाती, नवबौद्ध शेतकऱ्यांसाठी कृषी स्वावलंबन योजनेचे आर्थिक निकष वाढवायलाही मंत्रीमंडळानं आजच्या बैठकीत मान्यता दिली. कापूस आणि सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना पाच हजार रुपये प्रति हेक्टर असे दोन हेक्टरच्या मर्यादेत प्रत्येकी ५ हजार रुपये अनुदान देण्याचा निर्णय राज्य सरकारने यापूर्वीच घेतला होता. २०२३च्या खरीप हंगामासाठीच्या अनुदान वितरणाची सुरुवात आज झाली. पहिल्या टप्प्यात ४९ लाख ५० हजार खातेदारांच्या खात्यांमध्ये २ हजार ३९८ कोटी ९३ लाख रुपये जमा करण्यात येत आहेत.

**<><><><><>**

समग्र आरोग्यसेवा मानकामुळे जागतिक चिकित्सा पर्यटनाच्या नकाशावर भारताला विशेष स्थान मिळालं असल्याचं प्रतिपादन केंद्रीय आयुष्य राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी आज केलं. मुंबईत आयुष वैद्यकीय पर्यटन परिषदेच्या उद्घाटन समारंभात ते बोलत होते.

**होल्ड बाईट - प्रतापराव जाधव**

महाराष्ट्र, मध्यप्रदेश, राजस्थान आणि गोवा या राज्यांमधल्या वैद्यकीय, आयुर्वेदिक, आयुष रुग्णालये, पर्यटन स्थळं, प्रशिक्षण, कार्यशाळा इत्यादींची माहिती या परिषदेत देण्यात आली.  पंचकर्म- युनानी सारख्या विविध उपचार पद्धती, आयुष्यमान कार्ड, तसंच आयुष धोरण आणि उत्पादनं, योग आदींची सादरीकरणं झाली.

**<><><><><>**

केंद्रीय बंदरं, वाहतूक आणि जलमार्ग मंत्री सर्बानंद सोनोवाल यांनी आज मुंबईत एम्प्रेस या पर्यटन जहाजावर क्रूझ भारत या अभियानाचा प्रारंभ केला. भारताला जागतिक दर्जाचं समुद्रपर्यटन केंद्र म्हणून विकसित करण्याचा या अभियानाचा उद्देश आहे. यावेळी विविध सामंजस्य करारांवर स्वाक्षऱ्या झाल्या, तसंच नवनिर्मिती धोरण, विविधता आणि सर्वसमावेशकता धोरणाचा आरंभही त्यांच्या हस्ते झाला. बंदरं, वाहतूक आणि जलमार्ग राज्यमंत्री शंतनू ठाकुर, विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर आणि इतर मान्यवर यावेळी उपस्थित होते.

**<><><><><>**

संघटित पद्धतीने केलेल्या सायबर गुन्ह्यासंदर्भात सीबीआय अर्थात केंद्रीय अन्वेषण संस्थेने छापेमारी केली आहे. या कारवाईत देशभरातल्या २६ आरोपींना विविध शहरांतून अटक झाली आहे. यापैकी १० जणांना पुणे, ५ आरोपींना हैदराबाद

तर ११ आरोपींना विशाखापट्टणम इथून अटक झाली आहे. या प्रकरणी बेकायदेशीर पद्धतीने सुरू असलेल्या कॉल सेंटर्सचीही चौकशी सुरू असून आरोपींकडून विविध इलेक्ट्रॉनिक उपकरणं, मोबाईल, लॅपटॉप, आर्थिक तपशील यांच्यासह ९५१ वस्तू तसंच ५८ लाख ४५ हजार रुपये रोख रक्कम आणि तीन वाहनं जप्त करण्यात आली आहेत.

**<><><><><>**

ज्येष्ठ अभिनेते मिथुन चक्रवर्ती यांना दादासाहेब फाळके हा चित्रपटसृष्टीतल्या योगदानाबद्दलचा सर्वोच्च पुरस्कार जाहीर झाला आहे. पुढच्या महिन्यात होणाऱ्या ७० व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार सोहळ्यात त्यांना हा पुरस्कार प्रदान केला जाईल. केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज ही घोषणा केली.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी मिथुन चक्रवर्ती यांचं पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल अभिनंदन केलं आहे. मिथुन चक्रवर्ती यांना दादासाहेब फाळके पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल आपल्याला अतिशय आनंद झाला असून यामुळे मिथुन यांच्या चित्रपटसृष्टीतल्या योगदानाची दखल घेतली गेल्याचं प्रधानमंत्री म्हणाले. मिथुन हे सांस्कृतिक आदर्श आहेत, असे गौरवोद्गारही प्रधानमंत्र्यांनी काढले. दरम्यान, मिथुन चक्रवर्ती यांनी पुरस्काराबद्दल आनंद व्यक्त केला असून हा पुरस्कार आपले कुटुंबीय आणि चाहत्यांना अर्पण केला आहे.

**<><><><><>**

गेल्या कित्येक दिवसांपासून उच्चांकी पातळी गाठत असलेल्या देशातल्या शेअर बाजारात आज जोरदार घसरण दिसून आली. व्यवहार सुरू झाले तेव्हापासून सुरू झालेली ही घसरण सातत्याने वाढते आहे. सध्या सेन्सेक्स १ हजारांहून अंकांनी घसरुन ८४ हजारांच्या जवळ तर निफ्टी ३०० हून अधिक अंकांनी घसरुन २५ हजार ८०० अंकांजवळ व्यवहार करतो आहे. आशियाई बाजारातल्या घसरणीचा

परिणाम देशातल्या शेअर बाजारांवर दिसून येतोय. विदेशी संस्थात्मक गुंतवणूकदारांकडून होत असलेल्या विक्रीचा फटकाही बाजाराला बसला.

**<><><><><>**

‘स्वच्छता ही सेवा’ अभियान सध्या देशभरात राबवलं जात आहे. या अभियानांतर्गत आज परभणी इथं हे अभियान राबवण्यात आलं. याबबात बोलताना परभणी महानगरपालिकेचे आयुक्त सोमनाथ बनसोडे यांनी सांगितलं.

**बाईट - सोमनाथ बनसोडे सहाय्यक आयुक्त,मनपा (२१ सेकंद)**

**<><><><><>**

सरकारने आदिवासी समाजासाठी असलेल्या आरक्षणात कोणत्याही समाजाचा समावेश करू नये या मागणीसाठी हिंगोली जिल्ह्यातल्या वारंगा फाटा इथं रास्ता रोको आंदोलन सुरू आहे. आदिवासी युवक कल्याण संघाने सुरू केलेल्या या आंदोलनामुळे नांदेड-नागपूर तसंच नांदेड-अकोला रस्त्यावर वाहतूक कों्डी झाली आहे.

**<><><><><>**

उत्तरप्रदेशात काल झालेल्या दोन वेगवेगळ्या ठिकाणी झालेल्या अपघातात पाच जणांचा मृत्यू झाला आहे. नोएडा इथं ट्रॅक्टर आणि कारच्या अपघातात चार जणांचा मृत्यू झाला आहे. तर एक जण जखमी झाला आहे. जखमीला रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी या मृत्यूबद्दल दुःख व्यक्त केलं असून मृतांच्या कुटुंबीयांप्रती सहवेदना व्यक्त केली आहे. याप्रकरणी ट्रॅक्टर चालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दरम्यान, सोनभद्रमध्ये कारचालकाचं नियंत्रण सुटल्यामुळे झालेल्या अपघातात एक जणाचा मृत्यू झाला तर एक जण गंभीर जखमी झाला आहे.

**<><><><><>**

बिहारमध्ये सोळा जिल्ह्यांमधले चार लाख नागरिक पूरपरिस्थितीशी सामना करत आहेत कोशी, गंडक, बागमती, महानंदा आणि कमलबलान या नद्यांचं पाणी दुथडी भरुन वाहत आहेत. शेकडो गावे पुराचा सामना करत आहेत. पाऊस आणि पूरपरिस्थितीमुळे भारत-नेपाळ सीमेवरची रेल्वे सेवाही रद्द झाली आहे.

**<><><><><>**

भारत आणि बांगलादेश यांच्यातल्या दुसऱ्या कसोटीच्या आजच्या चौथ्या दिवशी बांगलादेशाचा पहिला डाव २३३ धावांवर आटोपला. चौथ्या दिवशी बांगलादेशनं पहिल्या डावातल्या १०७ धावांवरून पुढे खेळायला सुरुवात केली होती. मोमीनूल हकची नाबाद शतकी खेळी वगळता इतर कुणालाही खेळपट्टीवर टिकून राहता आलं नाही. जसप्रित बुमराहनं ३, तर आर. अश्विन, आकाशदीप आणि मोहम्मंद सिराज यांनी प्रत्येकी २ गडी बाद केले. त्यानंतर खेळायला आलेल्या भारताचा सलामीवीर २३ धावांवर तंबूत परतला. यशस्वी जयस्वाल १२ चौकार आणि २ षटकारांच्या बळावर ७२ धावा करुन बाद झाला. सध्या शुभमन गिल आणि रिषभ पंत खेळतो आहे. शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा भारताच्या २ बाद १३८ धावा झाल्या होत्या. पाऊस आणि ओलं मैदान यामुळं कसोटीचे अडीच दिवस खेळ झालेला नाही. दोन सामन्यांच्या या मालिकेत भारत सध्या १-० नं आघाडीवर आहे.

**//<><><><><>//**